


दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
dainiklokaarambh@gmail.com
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार १७ डिसेंबर २०२४ | अंक ८ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

# अखेर मनोज जरांगेंचा पत्ता ओपन, मंत्रिमंडळ विस्तार होताच अंतरवालीमधून केली मोठी घोषणा

## मंत्रिमंडळ विस्तारानंतर आता मनोज जरांगे पाटील ॲक्शन मोडमध्ये आल्याचं पाहायला मिळत आहे.



रविवारी मंत्रिमंडळाचा विस्तार झाला, त्यानंतर आता मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील ॲक्शन मोडमध्ये आल्याचं पाहायला मिळत आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळावं यासाठी मोठा लढा उभारला, त्यांच्या आंदोलनानंतर मराठा समाजाला सरकारनं स्वतंत्र आरक्षण दिलं, मात्र आम्हाला ओबीसीमधूनच आरक्षण पाहिजे अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांची आहे, ते अजूनही आपल्या मागणीवर ठाम आहेत. तर दुसरीकडे ओबीसी समाजाकडून या मागणीला विरोध होत आहे. दरम्यान मंत्रिमंड विस्ताराच्या दुस–याच दिवशी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा उपोषणाचा इशारा दिला आहे. मंत्र्यांचा शपथविधी झाला, आता उद्या पत्रकार परिषद घेऊन आमरण उपोषणाची तारीख सांगणार असल्याची घोषणा त्यांनी केली आहे. यावेळी बोलताना त्यांनी म्हटलं की, ज्यांना स्वतःच्या मनाने सामूहिक आमरण उपोषणाला बसायचं, त्यांनाच उपोषणाला बसवलं जाईल, उपोषणाला बसण्यासाठी कोणावरही बंधन घातलं जाणार नाही. आमरण उपोषणाला कोणी नाही जरी बसलं, तरी मी एकटाच बसणार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. पुढे बोलताना त्यांनी म्हटलं की, मी जर उपोषणाला बसा म्हटलं तर घराघरांमधून मराठे उपोषणाला बसतील, अशा इशाराही यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. सरकारने या हिवाळी अधिवेशनात मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी काढावा अशी मागणी जरांगे यांनी केली आहे. सरकार या आधिवेशनात मराठा आरक्षणाचा प्रश्न नक्की सोडवेल अशी अपेक्षा देखील त्यांनी व्यक्त केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बोलल्या प्रमाणे मराठा आरक्षण दिलं पाहिजे अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली आहे. दरम्यान काल मंत्रिमंडळाचा विस्तार झाला, मात्र या मंत्रिमंडळातून राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांचा पत्ता कट करण्यात आला आहे. यावरून भुजबळांनी नाराजी व्यक्त केली. भुजबळांना डावलण्यात आलं, यावर देखील जरांगे पाटील यांनी प्रतिक्रिया दिली. छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळात का घेतलं नाही? हा आमचा प्रश्न नसून मराठा आरक्षणाच्या मारेक–याच आम्हाला देणं घेणं नसल्याचं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

# बीड येथील घटना गंभीर; प्रकरणातील आरोपींवर कडक कारवाई करणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नागपूर, दि. १६ : बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील घटना गंभीर असून यास सरकारने गांभीर्याने घेतले आहे. संबंधीत आरोपी व दोषी पोलीसांवर कारवाई करण्यात आली असून या प्रकरणातील आणखी कोणी दोषी आढळल्यास त्यांच्यावरही कारवाई करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी २८९ अन्वये उपस्थित केलेल्या बीड



जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येविषयीच्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, या घटनेसाठी ङ्गसीआयडीफ्ची एक विशेष एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. तांत्रिक व कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून या प्रकरणाची चौकशी करण्यात येणार असून फरार आरोपींना लवकरच पकडण्यात येईल. या प्रकरणात एका पोलीस अधिका–यांस सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले असून एकास निलंबित करण्यात आले आहे. आरोपी कोणत्याही जाती, धर्माचा किंवा राजकीय पक्षाचा असला तरी तसेच कोणत्याही दबावाचा विचार न करता यासंदर्भात कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

# एकलव्य निवासी इंग्रजी शाळेसाठी २३ फेब्रुवारीला प्रवेश पूर्व परीक्षा


नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

किनवट : इंग्रजी माध्यमाच्या एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कूलमध्ये प्रवेशाकरीता रविवार २३ फेब्रुवारी २०२५ रोजी स्पर्धा परीक्षा आयोजित करण्यात येत आहे. या परीक्षेचा लाभ सन २०२४–२५ या शैक्षणिक वर्षात पाचवी, सहावी, सातवी व आठव्या वर्गात शिकत असणा–या अनुसूचित आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन प्रकल्प अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी श्रीमती कावली मेघना यांनी केले आहे. किनवट येथील एकात्मिक आदिवासी विकासच्या प्रकल्प अधिकारी श्रीमती कावली मेघना यांच्या कार्यालयाने त्यासंदर्भात जारी केलेल्या पत्रकामध्ये हे आवाहन करण्यात आले आहे. अप्पर आयुक्त आदिवासी विकास अमरावती यांच्या अधिनस्त असणा–्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळा जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळा तसेच शासनमान्य अनुदानीत प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिकणारी मुले या प्रवेश पूर्व परीक्षेसाठी पात्र ठरणार आहेत. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प किनवट अंतर्गत सदर प्रवेश स्पर्धा परीक्षा शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक कन्या आश्रम शाळा बोधडी येथे होणार आहे. एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कूल सहस्त्रकुंड ता. किनवट यांच्याकडे यासाठीचे विहित नमुन्यातील अर्ज उपलब्ध करण्यात आले आहेत. पूर्ण भरलेले अर्ज ३

फेब्रुवारी २०२५ पर्यंत मुख्याध्यापक आश्रमशाळा बोधडी येथे सादर करण्याचे आवाहन केले आहे.

# मस्साजोग प्रकरणात खा.बजरंग सोनवणेंनी उठविला संसदेत आवाज

## कायदा तुडविणा–या गुंडगिरीला फाशी द्या



बीड/प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी अपहरण करुन त्यांना टॉर्चर करत क्रूरपणे हत्या केली आहे. सदरील हत्या प्रकरण देशातील कायदा व सुव्यवस्थेवर झालेला मोठा आघात आहे. त्यामुळे या घटनेतील दोषींना फाशी देण्यात यावी.असा आवाज खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत सोमवार (ता.१६) रोजी उठविला आहे. दरम्यान मस्साजोग प्रकरणाचा संसदेत आवाज उठविल्याने या घटनेचा तपास पारदर्शक आणि कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता होणार आहे.खा.बजरंग सोनवणेंनी संसदेत प्रश्न उपस्थित केल्याने मस्साजोग प्रकरणातील मास्टर माईडचे धाबे दणाणले आहेत.



मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्येनंतर बीड जिल्ह्याचे सामाजिक वातावरण ढवळून निघाले आहे.या घटनेतील सर्व आरोपींना फाशी देण्यात यावी, यासाठी जिल्ह्यात मोर्चे, निवेदने, गावबंद आंदोलने सुरु आहेत.बीड जिल्ह्यात काही राजकीय लोकांनी गुंडगिरीचा उच्चांक गाठला आहे. सत्तेच्या जोरावर गुंडगिरी पोसून सामाजिक सलोखा बाधित केला जात आहे.एवढेच नाही तर खंडणीसारखे गुन्हे दाखल होवूनही पोलिसांकडून आरोपींना अटक केली जात नाही.संतोष देशमुख यांचे अपहरण झाल्यानंतर केज पोलिसांना त्याची तातडीने माहिती देण्यात आली होती. परंतू केज पोलिसांकडून हलगर्जीपणा करण्यात आला. या घटनेचे गंभीर्य घेतले असते तर संतोष देशमुख यांची हत्या झाली नसती.बीडचे पोलीस नेमके कोणाच्या इशा–यावर चालत आहेत.या सर्व बाबींचा कसून तपास होणे गरजेचे आहे. कारण त्याशिवाय हत्येचा मास्टर माईड कोण आहे? उघड होणार नाही. बीडमध्ये नुकत्याच पार पडलेल्या निवडणूकांमध्ये गुंडगिरी प्रवृत्तीच्या लोकांनी अक्षरशः कायदा आणि सुव्यवस्थेचे धिंडवडे उडविले होते. संतोष देशमुख यांची हत्या देखील याचं गुंड मानसिकतेतून झाली आहे. त्यामुळे या घटनेतील एकही आरोपी फाशीच्या शिक्षेतून वगळला जाऊ नये. त्यासाठी तपास अतिशय पारदर्शकपणे करण्यात यावा. असा प्रश्न खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत उपस्थित केला आहे.

# बेस्ट बसचे अपघात टाळण्यासाठी उपाययोजना राबविणार – मुख्यमंत्री फडणवीस

नागपूर : प्रतिनिधी मुंबईतील बेस्ट बसच्या अपघाताची घटना गंभीर असून राज्य शासनाने याची दखल घेतली आहे. अशा घटना घडू नयेत, यासाठी उपाययोजना केल्या जात असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. विधानपरिषदेत नियम २८९ अन्वये विधानपरिषद सदस्य सुनील शिंदे यांनी मांडलेल्या प्रस्तावावर मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. श्री. फडणवीस म्हणाले की, ङ्गबेस्टफ बसच्या अपघातातील वाहनचालकाची तपासणी केली आहे. या घटनेनंतर यादृच्छिक (रॅन्डम) पद्धतीने तपासणी करण्यास सुरूवात केली आहे. बेस्टमध्ये नवीन बसेस घेण्यासाठी १३०० बसेसची मागणी नोंदविण्यात आली असून त्या लवकरच बस ङ्गबेस्टफच्या ताफ्यात येणार आहेत. बेस्ट बसेसची वस्तुस्थिती जाणून घेऊन उपाययोजना राबविण्यासंदर्भात मुंबई महापालिका आयुक्तांना ङ्गबेस्टफप्रमुखांशी चर्चा करून आराखडा तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे या पीठासीन अधिकारी होत्या

# स्व.लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या जयंती निमित्त पुणे येथे रक्तदान शिबीर संपन्न



नांदेड : प्रतिनिधी स्व.लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान व आरोग्य शिबिर यांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमूख उपस्थित खडकवासला आमदार भीमराव अण्णा तापकीर व राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली ताई चाकणकर , या कार्यक्रमाला शिवसेना जिल्हाप्रमुख रमेश बापू कोंडे, ॲड शार्दुल जाधवर ॲड.स्वातीताई मोराळे, सुवर्ण शिरसाट,मनसेचे नेते मयुरेश वांजळे, शिवाजी मते, अविनाश लगड, भरतआबा कुंभारकर शिवसेना उपशहर प्रमुख, भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक किशोर भाऊ पोकळे, माझी नगरसेविका रुपाली ठोंबरे,संदीप पोकळे, महेश पोकळे, सारंगदादा नवले, दत्ताभाऊ कोल्हे, निलेशजी पांडे ,राहुल भाऊ घुले, सागर कोल्हे, नवनाथ दादा शिर्के, रुपेश घुले दिनेश मांगले दशरथनाना खिरड. तेजस हुलावळे, किरण वांजळे इत्यादी ची प्रमुख उपस्थिती होती, या कार्यक्रमाचा सूत्रसंचालन व प्रास्ताविक ॲड.पवनराजे डोईफोडे यांनी केले या कार्यक्रमांमध्ये ९० जणांनी रक्तदान व अनेक जणांनी आरोग्य तपासणी केली, या कार्यक्रमाचे आयोजन स्वर्गीय लोकनेते गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठान चे श्री संतोष मुंडे , श्री सतीश मुंडे व मित्रपरिवार यांनी केले होते



# पिठ्ठी येथे लिंबादेवी देवीची यात्रा संपन्न

## निसर्गरम्य वातावरणात भव्य कुस्त्यांचा आखाडा;

**प्रतिनिधी :- कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले**

पाटोदा तालुक्यातील पिठ्ठी येथील जागृत देवस्थान असलेले आराध्य दैवत श्री लिंबादेवी मातेचा पौर्णिमेला दत्तजयंती दिवशी यात्रा मोठ्या उत्साहात साजरी झाली. दोन दिवस हा यात्रा महोत्सव चालतो. पहिल्या दिवशी पौर्णिमेदिवशी देवीची पालखी भव्य दिव्य मिरवणूक, ऑर्केस्ट्रा, दुस–्या दिवशी भव्य कुस्त्यांचा हंगाम भरला या कुस्त्यांना बीड जिल्ह्यातून नामांकित पैलवानाची हजेरी लावली होती.. निसर्गरम्य वातावरणातील या भव्य कुस्त्यांचा आखाडा भरला होता.

# मध्य रेल्वेने यंदा नोव्हेंबरपर्यंत प्रवासी भाड्यातून ४,९६६ कोटी रुपये कमावले



मध्य रेल्वेने यंदाच्या आर्थिक वर्षात नोव्हेंबर २०२४ पर्यंत प्रवासी वाहतूक आणि उत्पन्नात उल्लेखनीय प्रगती केली आहे. मध्य रेल्वेने या आर्थिक वर्षात प्रवासी भाड्यातून नोव्हेंबर २०२४ पर्यंत ४,९६६ कोटी रुपये उत्पन्न मिळवले आहेत. गेल्यावर्षी याच काळात मध्य रेल्वेने प्रवासी वाहतूकीतून ४,६९९ कोटी रुपये मिळविले होते. अशा प्रकारे प्रवासी भाड्यातून मिळालेल्या उत्पन्नात ५.६८ % टक्क्यांची वाढ झाली आहे.

मध्य रेल्वेने नोव्हेंबर २०२४ पर्यंत गैर उपनगरीय मार्गाने ४,३२८ कोटी कमावले आहेत. जे गेल्यावर्षी याच कालावधीत कमावलेल्या ( ४,०९५ कोटी रुपये ) उत्पन्नाच्या ५.६९ % टक्के जास्त आहे. यावर्षी गैर उपनगरीय मार्गातून ६३८ कोटी रुपये जादा कमावले आहे. गेल्या वर्षी याच काळात कमावलेल्या ६०४ कोटी रुपयांच्या तुलनेत ५.६३% ने वाढ झाली आहे.

मध्य रेल्वेने या आर्थिक वर्षात नोव्हेंबर–२०२४ पर्यंत १०६४ दशलक्ष ( १०६.४ कोटी ) प्रवाशांची वाहतूक केली होती. गेल्या वर्षी याच काळात मध्य रेल्वेने १०३९ दशलक्ष ( १०३.९ कोटी ) प्रवाशांची वाहतूक केली आहे. गेल्यावर्षीच्या तुलनेत प्रवासी वाहतूकीत २.३५% ची वाढ झालेली आहे. यामध्ये या आर्थिक वर्षात १२७ दशलक्ष गैर – उपनगरीय ( १२.७ कोटी ) प्रवाशांचा समावेश आहे.

## संपादकीय

# समृद्ध व्यक्ति मत्त्वाचे महत्त्व

पहिल्या प्रकरणाचे शीर्षक ङ्गद कन्सेप्ट ऑफ ह्यूमन पर्सनहूडफ असे असून या प्रकरणात मानवी व्यक्तिमत्त्वाच्या संकल्पनेची सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. मानवी व्यक्तिमत्त्वासंबंधी विवेचन करताना प्रथम मनुष्य म्हणजे काय याचा सखोल विचार करणे गरजेचे आहे. सध्याच्या शैक्षणिक प्रगतीमुळे मानवाला भौतिक विकास साध्य करणे शक्य झाले आहे. त्याचबरोबर तो हरवत असलेले व्यक्तिमत्त्व समृद्ध करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. कौटुंबिक विश्वातच व्यक्तिमत्त्वाच्या घडणीला प्रारंभ झाला तरी, विकासासाठी शिक्षणाची जोड महत्त्वाची आहे. यासंबंधी अभ्यासपूर्ण विश्लेषण फादर डॉ. पॅट्रिक डिसोझा यांनी त्यांच्या ङ्गट्रेझर्स ऑफ ह्यूमन पर्सनहूडफ या पुस्तकामध्ये केले आहे. पहिल्या प्रकरणाचे शीर्षक ङ्गद कन्सेप्ट ऑफ ह्यूमन पर्सनहूडफ असे असून या प्रकरणात मानवी व्यक्तिमत्त्वाच्या संकल्पनेची सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. मानवी व्यक्तिमत्त्वासंबंधी विवेचन करताना प्रथम मनुष्य म्हणजे काय याचा सखोल विचार करणे गरजेचे आहे. सर्वच धर्मात मनुष्य म्हणजे काय, त्याचे कर्तव्य काय यासंबंधी सविस्तर विवेचन पाहावयास मिळते, त्याचप्रमाणे चिनी तत्त्ववेत्ता विंग-त्सिट चांग, प्लेटो, मारिटन कार्ल मार्क्स, सार्त्र, पुर्सेल, स्वामी रंगनाथन्, कॅसियर, मास्लो, डॉ. राधाकृष्णन्, स्वामी विवेकानंद या तत्त्वज्ञांनींनीही मनुष्य म्हणजे काय संबंधी आपले विचार नोंदविलेले आहेत. मनुष्य म्हणजे काय, या मूलभूत समस्येचा विचार केल्याखेरीज मनुष्यत्व यासंबंधी विवेचन पुढे जाऊ शकत नाही. मानवी व्यक्तित्वात पुढील घटक असतात, शारीरिक, मानसिक, भावनिक, आध्यात्मिक, नैतिक, धार्मिक, वैयक्तिक घटक आणि सामाजिक. चांगल्या व्यक्तिमत्त्व घडणीसाठी या सर्व घटकांचा संतुलित विकास अपेक्षित आहे. दुसऱ्या प्रकरणाचे शीर्षक ङ्गद नीड ऑफ द पर्सनहूड एन्हान्समेंट ऑफ द स्टुडंटफ असे असून त्यात शालेय जीवनात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्याची काय आवश्यकता आहे, याचे विश्लेषण केले असून विद्यार्थ्यांचा संपूर्ण व्यक्तिमत्त्व हेच शिक्षणाचे उद्दिष्ट असावे, याविषयी मार्गदर्शन केले आहे. शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास साध्य करताना व्यक्तिमत्त्व विकासातील विविध घटकांचा विकास साध्य झाला पाहिजे असे नमूद केले आहे. ङ्गद रिक्वायरमेंट ऑफ द सप्लिमेंटरी एज्युकेशन प्रोग्रॅम (एसईपी) टू इन्हान्स द ह्यूमन पर्सनहूड ऑफ कॉलेज स्टुडंसफ या प्रकरणात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी पूरक अभ्यासक्रमाची जोड देण्याची काय गरज आहे, यासंबंधी चर्चा करण्यात आली आहे. भारतीय शिक्षण पद्धतीत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाची हमी देण्यात आलेली नाही. भारतीय शिक्षण पद्धतीत विद्यार्थ्यांच्या भावनिक घटकांकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे, तसेच विद्यार्थ्यांच्या सृजन क्षमतेचाही विचार केला पाहिजे. सध्याच्या परीक्षा पद्धतीत अनेक त्रुटी आहेत. या शिक्षण पद्धतीत विद्यार्थ्यांच्या भावनिक घटकांकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी सध्याच्या शिक्षण पद्धतीला पूरक शैक्षणिक कार्यक्रमाची जोड देण्याची गरज असल्याचे मत लेखकांनी मांडले आहे. ङ्गद डेव्हलपमेंट ऑफ द सप्लिमेंटरी एज्युकेशनल प्रोग्राम्म या प्रकरणात पूरक अभ्यासक्रमासाठी काय करायला हवे, या कार्यक्रमाची मार्गदर्शन तत्त्वे काय असावीत, ङ्गनव मानवफ घडविण्याचे शिक्षणाचे उद्दिष्ट कसे साध्य करता येईल, या संबंधी सविस्तर विवेचन केले आहे. या पूरक शिक्षणात चांगल्या सवयीवर भर देण्यात आला असून प्रत्येकाकडे प्रेमभावनेने, आदराने बघण्याची वृत्ती वाढीस लावण्याबरोबर ध्यानसाधना करण्यावरही भर देण्यात आला आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला गती देण्यासाठी पूरक अभ्यासक्रम कसा कृतीत आणता येईल, यासंबंधी विवेचन, ङ्गकंडक्टिंग द सप्लिमेंटरी एज्युकेशन प्रोग्रॅम टू एनहान्स द ह्यूमन पर्सनहूड ऑफ कॉलेज स्टुडंटसफ या पाचव्या प्रकरणात करण्यात आली आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्याचे व्यक्तिमत्त्व घडविण्यात पूरक शिक्षणपद्धती कशी परिणामकारकपणे कार्य करते याचे विवेचन सहाव्या प्रकरणात आहे. सातव्या प्रकरणात मानवी व्यक्तिमत्त्वाच्या विविध घटकांतील (बौद्धिक, भावनिक, आध्यात्मिक) गुणांक कसे ठरवावेत, यासंबंधी लेखकाने स्वतः तयार पद्धती स्पष्ट केली आहे. सध्या तरुणांमध्ये कौटुंबिक संबंध दुरावत चालले आहेत. नात्यातील परस्पर ओलावा कमी होत चालला आहे. मैत्रीमधील स्नेहार्द्रता घटत चालली आहे. त्यांच्यात एकाकीपणा वाढीला लागत आहे. आत्मविश्वास ढासळत आहे. त्यामुळेच स्पर्धात्मक परीक्षांसाठी अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांत आत्महत्येचे प्रमाण वाढत आहे. बेरोजगारी वाढत आहे.

# अग्रलेख अठराव्या वर्षातील विश्वविजेता

भारताचा डोम्माराजू गुकेश नवा बुद्धिबळ जगज्ञेता ठरला. सिंगापूर येथे गुरुवारी फिडे जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत १४व्या आणि अंतिम डावात गतविजेता चीनच्या डिंग लिरेनला चेकमेट देत त्याने जेतेपदाला गवसणी घातली. त्यानंतर संपूर्ण भारतात अनोख्या जल्लोषाला सुरुवात झाली. स्पर्धेच्या १३८ वर्षांच्या इतिहासात १८ वर्षीय गुकेश हा जगातील सर्वात तरुण विजेता ठरला. याबाबत त्याने माजी विजेते, महान खेळाडू रशियाचे गॅरी कास्पारोव्ह यांना मागे टाकले. आपले महान खेळाडू आणि माजी विश्वविजेता विश्वनाथन आनंद यांच्यानंतर वर्ल्ड चॅम्पियन बनलेला गुकेश हा भारताचा केवळ दुसरा बुद्धिबळपटू आहे. गुकेश हा पाच वेळा विश्वविजेता आनंद यांचा शिष्य आहे. आनंद यांच्या वेस्टब्रिज आनंद बुद्धिबळ अ‍ॅकॅडमीमध्ये प्रशिक्षण घेतो. आनंद यांनी २०००मध्ये पहिल्यांदा भारतात जगज्ञेतेपदाची ट्रॉफी आणली. त्यानंतर २००७ ते २013 या कालावधीत चार असे एकूण विक्रमी वेळा जगज्ञेतेपदावर नाव कोरले. त्यानंतर तब्बल १३ वर्षांनी त्यांच्या शिष्याने ही अनोखी कामगिरी साकारली. जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेच्या इतिहासात विश्वविजेती ठरलेली आनंद-गुकेश ही जगभरातील पहिलीच जोडी आहे. कुठल्याही खेळात जगज्ञेतेपद मिळवणे सोपे नसते. फिडे जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धाही त्याला अपवाद नाही. यंदा सिंगापूरमध्ये १७ दिवस रंगलेल्या जागतिक स्पर्धेत डिंग आणि गुकेश यांच्यात चुरशीची लढत झाली. गतविजेता लिरेन जेतेपद राखण्यासाठी उत्सुक होता. या वर्षाच्या सुरुवातीला झालेली चॅलेंजर्स स्पर्धा जिंकून गुकेशने प्रबळ दावेदारी पेश केली. यंदाच्या स्पर्धेत १४ पैकी चार डाव निकाली ठरले, तर दहा डाव बरोबरीत (ड्रॉ) झाले. डिंग लिरेनने पहिला डाव ४२व्या चालीमध्ये जिंकताना आश्वासक सुरुवात केली. दुसऱ्या डावात पिछाडीवरून गुकेशने स्वतःला सावरले. हा डाव बरोबरीत सुटला. त्यानतंर गुकेशने तिसऱ्या डावात ३७व्या चालीमध्ये विजय मिळवून जबरदस्त पुनरागमन केले. तोडीसतोड खेळाचे प्रदर्शन झाल्याने चौथा ते दहा असे सलग सात डाव बरोबरीत सुटले. ११व्या डावात पांढऱ्या मोहऱ्यांनिशी खेळताना गुकेशने प्रतिस्पर्ध्याला कोंडीत पकडत २९व्या चालीमध्ये मात दिली. मात्र, पुढच्याच डावात डिंगने पलटवार करताना विजय मिळवला. १३व्या डावात दोघांनीही सावध पवित्रा घेतला. तेव्हा लिरेन आणि गुकेशच्या खात्यात प्रत्येकी ६.५ गुण होते. त्यामुळे १४व्या आणि अंतिम डावाकडे अवघ्या जगाचे लक्ष लागून राहिले होते. निर्णायक डावात गुकेशने काळ्या सोंगट्यांसह खेळूनही बाजी मारली. हा डाव बरोबरीकडे झुकणार असे वाटत होते; परंतु ५५व्या चालीत लिरेनने मोठी चूक केली. ज्याचा फायदा उठवत गुकेशने ७.५-६-५ अशा फरकाने पहिल्यावहिल्या जगज्ञेतेपदावर शिक्कामोर्तब केले. गुकेशच्या जागतिक यशात स्ट्रेंथ आणि कंडिशनिंग प्रशिक्षक पॅडी अपटन यांचा मोठा वाटा आहे. अपटन यांच्याच मार्गदर्शनाखाली भारताच्या क्रिकेट संघाने २०११ वनडे विश्वचषक आणि २०२४ पॅरिस ऑलिम्पिकमध्ये हॉकीमध्ये कांस्यपदकाची कमाई केली होती. गुकेशसारख्या युवा खेळाडूला मदत करत पॅडी अपटन यांनी पुन्हा एकदा आपले वेगळेपण सिद्ध केले. जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत खेळणे प्रत्येक बुद्धिबळपटूसाठी खडतर मानले जाते. अनेकदा हा सामना फक्त तुम्ही शिकलेल्या चालींचा नाही, तर मानसिकतेचाही होतो. मॅग्नस कार्लसनसारखा विख्यात बुद्धिबळपटूही आपली पहिली जागतिक अजिंक्यपद स्पर्धा खेळत असताना थोडासा विचलीत झाला होता. डिंग लिरेनला आव्हान देत असताना विजेतेपदासाठीच्या लढतीत गुकेशला सुरुवातीलाच दोन धक्के बसले. पहिल्याच सामन्यात झालेला पराभव आणि त्यानंतरच्या सामन्यात विजय शक्य असतानाही झालेला पराभव गुकेशसाठी धक्कादायक होता; परंतु यानंतर गुकेशने जो खेळ केला तो निव्वळ अविश्वसनीय होता. तुम्हाला एखाद्या परीक्षेत चांगली कामगिरी करायची असेल तर संपूर्ण पुस्तकाचा तुम्हाला चांगल्या पद्धतीने अभ्यास करावा लागतो. तेव्हाच तुम्ही परीक्षेत आत्मविश्वासाने जाऊ शकता. केवळ आशेच्या जोरावर तुम्ही परीक्षा देऊ शकत नाही. स्पर्धे दरम्यान किती वेळ झोपायचे, पिछाडीवर किंवा दबावाखाली स्वतःला कसं सावरायचे तसेच प्रत्येक क्षणांचा कसा सामना करायचा याचा अभ्यास करून गुकेश अंतिम सामन्यात उतरला होता. त्यामुळे पहिल्याच प्रयत्नात त्याने जगज्ञेतेपदावर नाव कोरले, हे अपटन यांनी गुकेशच्या मेहनतीबद्दल केलेले भाष्य खूप काही सांगून जाते. प्रत्येक खेळाडूने त्याप्रमाणे स्वतः ला घडवायला हवे. मूळचा चेन्नईचा असलेल्या गुकेशचे आई-वडील उच्चशिक्षित आहेत. त्याची आई मायक्रोबायोलॉजिस्ट आणि वडील डॉक्टर आहेत. मात्र, गुकेशला त्याच्या आई-वडिलांच्या क्षेत्रापेक्षा बुद्धिबळमध्ये अधिक रूची होती. सातव्या वर्षी बुद्धिबळ खेळायला सुरुवात करणाऱ्या गुकेशने केवळ ११ वर्षांच्या कालावधीत वर्ल्ड चॅम्पियन बनून भारताचे नाव उज्ज्वल केले आहे. अत्यल्प काळात मिळवलेले यश त्याची मेहनत, एकाग्रता आणि बुद्धिमत्ता दर्शवते. जेतेपद पटकावल्यानंतर गुकेश भावुक झाला. त्याला आनंदाश्रू अनावर झाले. स्पर्धा संपल्यानंतर पत्रकार परिषदेत पुन्हा बुद्धिबळाचा पट जसा मांडतो तसा मांडला आणि त्याला नमस्कार केला. ही आपली संस्कृती आहे. परंपरा आहे. ती त्याने परदेशातही जपली. गुकेश हा जगज्ञेतेपदामुळे युवा पिढीसाठी एक प्रेरणास्त्रोत बनला आहे. आपल्याकडे अठरावं वरीस धोक्याचे मानले जाते. कारण मुले सज्ञान होतात. या वयात बिघडण्याचा धोका अधिक असतो. मात्र, अठरावे वर्ष हे विश्वविक्रमाचे असते, हे डोम्माराजू गुकेशने दाखवून दिले

# बांगलादेश अफगाणिस्तानच्या दिशेने

बांगलादेशातील उद्रेकाने शेख हसीना सरकार उलथवल्यानंतर तेथे इस्लामिक कट्टरतावाद्यांना हिंसाचार व रक्तपात घडवायला रान मोकळे मिळाले आहे. पाकिस्तान समर्थित कट्टरतावाद्यांनी देशातील अल्पसंख्य असलेल्या हिंदूंना हल्ल्याचे टार्गेट बनवले आहे. हिंदूंना घराबाहेर पडणे मुश्कील झाले आहे, अनेक मंदिरांवर हल्ले करून तेथील देवदेवतांच्या मूर्तींची तोडफोड करण्यात आली आहे. इस्कॉन मंदिराला आग लावण्यात आली. बांगलादेशातील हिंदूंकडे देशाचे शत्रू म्हणून बघितले जात आहे. बांगलादेशच्या स्वातंत्र्य लढ्यात भारताचे योगदान सर्वात मोठे होते, पण आज ५३ वर्षांनंतर इस्लामिक कट्टरतावाद्यांच्या हिट लिस्टवर भारताचा क्रमांक पहिला आहे. जनतेतील प्रक्षोभ आणि बेलगाम हिंसाचारानंतर तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना यांना स्वत:लाच देशातून पलायन करावे लागले आणि त्यानंतर बांगलादेशमध्ये भारत द्वेष आणि हिंदू विरोध उफाळून आला आहे. हिंदूंवर हल्ले होत असताना युनूस सरकार हल्लेखोरांना रोखण्यासाठी कोणतीही ठोस कारवाई करताना दिसत नाही. पोलीस बघ्याची भूमिका घेत आहेत. प्रशासन हल्लेखोरांपुढे हतबल झाले आहेत. बांगलादेशात हिंदूंवर होणाऱ्या हल्ल्यांच्या निषेधार्थ भारतात देशभर हिंदू संघटनांनी रस्त्यावर उतरून निदर्शने केली. महाराष्ट्रातही अनेक शहरात हिंदू संघटनांनी शक्तिप्रदर्शन घडवून बांगलादेशातील हिंदूंच्या पाठीशी भारतीय जनता खंबीरपणे उभी असल्याचे दाखवून दिले. सिंधुदुर्ग जिल्ह्यात निलेश राणे, नितेश राणे या आमदार बंधूंनी विराट मोर्चा काढून हिंदूंची संघटित ताकद रस्त्यावर उतरवली. बांगलादेशात हिंदूंच्या विरोधात होत असलेल्या हिंसाचाराबद्दल जागतिक स्तरावर अनेक देशांनी चिंता प्रकट केली. ब्रिटनच्या संसदेतही हा मुद्दा मांडला गेला. अमेरिकेच्या व्हाइट हाऊसनेही हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराची गंभीर नोंद घेतली. बांगलादेशमध्ये नोबेल पारितोषिक विजेत्या मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखाली हंगामी सरकार असले तरी ते त्यांचा भारत विरोधी अजेंडा सोडायला मुळीच तयार नाहीत. काश्मीरच्या खोऱ्यात १९९० च्या दशकात पंडितांवर हल्ले होत होते, पंडितांना घरात घुसून ठार मारले जात होते, पंडितांना त्यांच्या परिवारासह अंगावरच्या वस्त्रानिशी खोऱ्याबाहेर पळून जाण्यास भाग पाडले जात होते, हिंदू महिलांवर अत्याचार व बलात्कार झाले. आता त्याच घटना बांगलादेशात घडत आहेत. बांगलादेशातील हिंदूंना तिथे जिणे मुश्कील केले जात आहे. काश्मीरच्या खोऱ्यात हिंदूंवर अत्याचार करणारे इस्लामिक कट्टरतावादी होते आणि बांगलादेशातही तेच आहेत. त्यांच्या पाठीशी पाकिस्तान प्रेरित कट्टरतावादी संघटना व गुप्तचर संघटना आहेत. पाकिस्तानातून या देशात शस्त्रास्त्रे येत आहेत. हसीना शेख यांच्या कट्टर राजकीय विरोधक बेगम खलिदा झिया व पाकिस्तानी अधिकारी यांच्यात संवाद होत असल्याच्याही बातम्या आहेत. शेख हसीना यांना सत्तेवरून पदच्युत केल्यानंतर बांगलादेशच्या माध्यमातून पाकिस्तानी गुप्तचर संघटना भारताला व हिंदूंना टार्गेट करीत आहेत. पाकिस्तानची पहिली शिकार ही बांगलादेशातील हिंदू आहेत, त्यांच्यावर अत्याचार व हल्ले होत आहेत. बांगलादेशात सैन्याच्या मदतीने भारताच्या विरोधात मोहीम सुरू करणे हा पाकिस्तानच्या रणनितीचा दुसरा भाग असू शकतो आणि तिसरा भाग म्हणजे भारतीय बनावटीच्या वस्तूंवर व साधनसामग्रीवर बांगलादेशात बहिष्कार पुकारणे, त्यातून भारताची आर्थिक कोंडी करण्याचा प्रयत्न करणे. देशात हिंदू विरोधी हिंसाचाराच्या घटना वाढल्यावर बांगलादेशाने कोलकता व त्रिपुरा येथून आपले दूतावासातील अधिकाऱ्यांना विचारविनिमय करण्यासाठी बोलावून घेतले. एवढेच नव्हे तर बांगलादेशचे संस्थापक शेख मुजीबूर रहमान यांचे बांगलादेशच्या चलनी नोटांवरून फोटो काढून टाकण्याचे फर्मान निघाले. मोहम्मद युनूस सरकारने भारताबरोबर झालेला मोबाईल इंटरनेट कनेक्टिव्हीटी समझोता रद्द केला आहे. भारताच्या ईशान्येकडील राज्यांना त्याचा फटका बसणार आहे. हा समझोता शेख हसीना सरकारने केला होता. भारताच्या ईशान्येकडील राज्यात मोबाइल इंटरनेट कनेक्टिव्हीटी चांगली नाही. रिजनल डिजिटल हबच्या माध्यमातून बांगलादेश सीमेवर इंटरनेट सर्किट स्थापन करण्यात येणार होते. त्यातून ईशान्येकडील राज्यांना डेटा ट्रान्समिशन सुविधा उपलब्ध होणार होती. हे काम भारती एअरटेलने समीट कम्युनिकेशन या बांगलादेशी कंपनीच्या मदतीने पूर्ण करायचे होते. बांगलादेश टेलिकम्युनिकेशन रेग्युलेटरी कमिशनने त्याला मंजुरीही दिली होती. पण युनूस सरकारने या कराराचा बांगलादेशला काहीही आर्थिक लाभ नाही, असे कारण देऊन करार रद्द करून टाकला. समीट कम्युनिकेशनचे चेअरमन मोहम्मद फरिद हे शेख हसीना यांच्या अवामी लीगच्या खासदारांचे धाकटे भाऊ आहेत. दोन देशांतील संबंध सुरळीत व्हावेत यासाठी भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी मोहम्मद युनूस यांची ढाक्यात जाऊन भेट घेतली. शेख हसीना सत्तेवरून पायउतार झाल्यावर भारत-बांगलादेशातला हा पहिलाच संवाद होता. दि. ५ ऑगस्ट २०२४ला हसीना यांच्याविरोधात मोठा उठाव झाला व त्यांना भारतात आश्रय घेणे भाग पडले. बांगलादेशात निदर्शकांनी लुटालूट-जाळपोळ व सरकारी मालमत्तांचे मोठे नुकसान केले. जनक्षोभापुढे पोलीस व सुरक्षा दलांनी शस्त्रे खाली टाकली. आज या देशात इस्लामिक कट्टरतावाद्यांकडून हिंदूंवर अत्याचार होत असताना, हिंदूंची मंदिरे व मालमत्ता यांना आगी लावल्या जात असताना पोलीस बघ्याची भूमिका घेत आहेत. हसीना व अवामी लिगचे नेते हे निदर्शकांचे टार्गेट आहे. राजकारणी, कलावंत, नोकरशहा, पत्रकार, बुद्धिमंत, सामाजिक नेते असे शेकडो जण स्वत:चा जीव वाचविण्यासाठी आर्मी कॅन्टोन्मेंटमध्ये आश्रयाला आहेत. बांगलादेशातील हिंदू हे अवामी लिग व शेख हसीनाचे समर्थक म्हणून ओळखले जातात म्हणून हसीना विरोधकांचे व कट्टरतावाद्यांचे सॉफ्ट टार्गेट हिंदू बनले आहेत. बांगलादेशच्या बांगला व इंग्रजी वृत्तपत्रांतूनही हिंदूंवर होणाऱ्या हल्ल्यांची आकडेवारी प्रसिद्ध झाली आहे. भारताने चिंता व्यक्त केली, तर तो आमचा अंतर्गत मुद्दा आहे असे उत्तर युनूस सरकारने दिले आहे. हसीना यांनी भारतात पलायन केल्यावर अवामी लिगच्या हजारो नेते, पदाधिकारी यांनी देशाबाहेर जाण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना सीमेवर रोखण्यात आले. हसीना सरकारमधील अनेक मंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप ठेवण्यात आले आहेत. कट्टरतावाद्यांच्या विरोधात लिहिणाऱ्या पत्रकारांनाही अटक करण्यात आली आहे. भारतीय माध्यमांनीच बांगलादेशमधील चित्र भडकपणे रंगवले असा आरोप युनूस सरकारकडून केला जात आहे. भारतात आश्रयाला असलेल्या हसीना सतत युनूस सरकारच्या विरोधात भाष्य करून बांगलादेशातील वातावरण प्रक्षोभक बनवतात, असाही आरोप केला जात आहे. कोलकत्ता, त्रिपुरा या दोन शहरांशी बांगलादेशवासीयांचा दैनंदिन संबंध आहे. दोन्ही देशांत परस्परांचे नातेसंबंध आहेत. रोटी-बेटी व्यवहार आहेत. व्यापारउद्योगासाठी दोन्हींकडून ये-जा मोठ्या संख्येने आहे. पण आता वातावरण बिघडले आहे. सीमेवर दोन्ही देशांची सुरक्षा दले आहेत. बांगलादेशने तर पाकिस्तानी नागरिकांना व्हिसाची गरज नाही असे जाहीर करून पाकिस्तानला ये-जा करण्याचा मुक्त परवाना दिला आहे. आम्ही एकवेळ तुरुंगात राहू पण बांगलादेशात परतणार नाही, असे त्रिपुरामधील बांगलादेशी हिंदूंनी म्हटले आहे. त्रिपुरात बांगलादेशविरोधात मोठी निदर्शने झाली. बांगलादेशात उच्चायुक्तांच्या कार्यालयाची मोडतोड झाली. त्रिपुराला तर बांगलादेशने तीनही बाजूंनी वेढलेले आहे. पश्चिम बंगाल, आसाम, मेघालय, त्रिपुरा, मिझोराम ही राज्ये बांगलादेश सरहद्दीजवळ आहेत. कोलकत्ता नि आगरतळा येथून ढाका येथे नियमित बस सेवा आहे. व्यापार, उद्योग, औषधोपचार, नातेसंबंध यासाठी हजारो बांगलादेशी भारतात नियमित ये-जा करीत असतात. दोन देशांत आयात-निर्यातही मोठी आहे. बांगलादेशाने भारतावर निर्बंध लादून आता पाकिस्तानशी सलोखा निर्माण केला आहे. कराची ते चटगाव जहाज वाहतूक सुरू झाली आहे. ढाकामध्ये भारतीय उत्पादनावर बहिष्कार घालण्यात आला आहे. भारतीय वस्तूंची होळी केली जात आहे. मोहम्मद युनूस हे देशात शांततेसाठी प्रयत्न करतील व नवे सरकार स्थापनेसाठी वातावरण निर्माण करतील अशी अपेक्षा होती. पण ते कट्टरपंथीयांच्या आहारी जाऊन काम करीत आहेत की काय अशी शंका वाटू लागली आहे. बांगलादेशाच्या निर्मितीसाठी लाखो बांगलादेशींनी बलिदान दिले होते, त्याची आठवणही कोणाला राहिलेली नाही. उलट कट्टरपंथी बांगलादेशी पाकिस्तानलाच आपला रहनुमा मानू लागले आहेत. इस्लामिक कट्टरवाद्यांचा भारत द्वेष व पाकिस्तान प्रेम उफाळून येत आहे.

# गलथान नगरपालिका, षंढ जनता?

नगर पालिका कधी जागी होणार? नगरपालिका डोळ्यावरचे झापड कधी उघडणार? नगर पालिकेचा गलथाण कारभार कधी थांबणार? हो मला हेच म्हणायचं की, नगरपालिकेचा गलथाण कारभार कधी बंद होणार? नगरपालिकेला कधी कळणार की, बीड मध्ये जागोजागी कचरा कुंडी ची आवश्यकता आहे. नगरपालिकाने डोळ्याला झापडे लावले असतील तर ती जरा उघडा आणि तुम्हाला जाणूनबुजून नसेल उघडायची तर आम्ही तयारच आहोत तुमची झापडं उघडायला. आपला कचरा सर्व कचरा कुंडीत टाकावा अशी जनजागृती करा. काही तरी लोकांना दंड ठेवा. कचऱ्यामुळेच बीड शहरात घाणीचे साम्राज्य झालं आहे. थोडक्यात असताना पालिकेने केलं असतं तर बीडमध्ये एवढी घाण पसरली नसती. एक गल्ली एक कचरा कुंडी, एक कॉलनी एक कचरा कुंडी. या सूत्रांची अंमलबजावणी केली असती तर आज एवढी घाण पसरली नसती. नगरपालिकेचे महत्वाचे काम काय असते तर शहरा मध्ये स्वच्छता ठेवणे. पाण्याचा प्रश्न सोडवणे. इतर बाकी कामे आहेतच. शहरात काहीच स्वच्छता नाही. मग मला एक प्रश्न पडला की, शहरासाठी आलेला निधी जातो कुठे? शहर स्वच्छ होत नाही. नळांना पाणी व्यवस्थित नाही. शहरात ५० ठिकाणी बॅनर लागतात. त्याला परवानगी दिली तर ठीक नसेल परवानगी तर ते बाकी बॅनर कोणी



**रुपाली देशपांडे**
**मो.८८८८९५५५३९**

लावले आणि कसे? हा प्रश्नच आहेच. शहरातील नाल्या व्यवस्थित नाही. ज्या आहेत तिथे कचरा अडकलेला असतो. ट्रॅफिक पोलीस नीट काम करत नाही. त्या मुळे होणारे अपघात आणि मरणाऱ्यांची संख्या जास्त होत चालली आहे. हे सगळं नगरपालिकेचं काम असताना शहराची अवस्था काय आहे. आलेला निधी तिथेच जिरतो का? जिरत नसेल तर पैसा कुठे आहे? थोडा दिखाऊपणा करून थोडा पैसा कामा साठी लावायचा आणि बाकी पैसा कुठे आहे. याला लोक हि कारणीभूत आहेत. कारण लोकांना प्रश्नच पडत नाही. जनसामान्य माणसे तसेच मुस्कट दाबून राहतात. लोकहो, विचारा पालिकेला विकासाचा पैसा कुठे आहे? मग बघा काय काय होत ते. समाजाला जोपर्यंत प्रश्नच पडत नाही तोपर्यंत विकास होणार नाही. लोकांच्या वतीने मी विचारते , आलेला निधीचे काय होते? नगरपालिका कधी जागी होणार? आलेला निधी असाच गायब होणार का? मला आता मीडिया ला सुद्धा विचारायचं आहे की, तुम्ही लोक मूग गिळून गप्प का? असे हि असेल कदाचित थोडाफार निधी मधील पैसा तुमच्या पर्यंतही पोहचला असेल. निवडणूक आली की तुम्ही लोक एवढे जागे होतात की विचारायची सोय नाही. दिवसरात्र त्याचं बातम्या. मग इकडे एखादी चुकून बातमी टाकली की बस मग शांत? तुम्ही हि गोष्ट मग मनावर का घेत नाही? याचं उत्तर मीडियाने द्यावे. कारण मीडिया खूप जलद गतीने काम करतो तसेच. जनजागृती चे हि काम प्रभावित होते. असे असूनही मीडिया गप्प का? लोकंहो, तुम्हीच आता जागे व्हा. तुमचे प्रश्न तुम्हीच सोडवा. तुम्हीच तुम्हला न्याय मिळवून द्या, जागे व्हा असे झोपून कसे चालेल? तुम्ही जागे झालात तर नगरपालिका जागी होईल. रोज उठून पाणी, वीज या गोष्टी पण सोडवता येत नसेल तर लोकंहो तुम्ही षंड आहात का? असेच म्हणावे लागेल. नगरपालिकेला अजून एक विचारायचे आहे की, स्वातंत्र्य मिळून इतकी वर्ष होऊन गेले तुम्ही अजूनही बेसिक प्रश्न ही सोडवले नाही? तुम्हाला आजच्या काळत ही या प्रश्नावर भाकरी भाजून घ्यायची आहे का? हेच प्रश्न अजून हि तसेच ठेऊन जनतेला आहे तसे ताटकळत ठेवायचे अन वर्षाहून वर्षे निधी जिरवायचा आहे का? असे असेल तर आम्हाला आवाज उठवावा लागेल आणि आवाज आता मुबंईचं काय दिल्ली पर्यंत जाईल इतका कणखर आहे. उठा जागे व्हा.

बीड/महाराष्ट्र
विशेष वार्ता

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

मंगळवार १७ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com


# बाल वैज्ञानिकसाठी प्रगती विद्यालयाच्या पाच विद्यार्थ्यांची निवड



बीड । प्रतिनिधी मुंबई सायन्स टीचर्स असोसिएशन मार्फत घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय परीक्षेत प्रगती विद्यालय बालेपीर बीड येथील पाच विद्यार्थ्यांची बालवैज्ञानिक साठी निवड झाली आहे बीड शहरात अल्पावधीत शैक्षणिक क्षेत्राच्या विविध परीक्षेत उज्वल यश संपादन करीत आहे डॉक्टर होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षेत प्रगती विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे यशस्वी गुणवंत विद्यार्थी खालील प्रमाणे १) तेजल बांगर ६४ गुण २) सानिका बांगर ६० गुण ३) राधेश्याम आघाव ५८गुण ४) अश्विनी मिसाळ ५६ गुण ५) सृष्टी तिडके ५५ गुण या सर्व गुणवंत विद्यार्थी पुणे येथे होणाऱ्या द्वितीय परीक्षेत पात्र ठरले आहेत वरील सर्व विद्यार्थ्यांचा शाळेचे संस्थापक आदरणीय रामकृष्ण जी बांगर साहेब, सचिव सौ सत्यभामाताई बांगर ,युवा नेता विजयसिंह बांगर प्रगती विद्यालयाचे मुख्याध्यापक गोपाळघरे सर जनता विद्यालयाचे मुख्याध्यापक कंठाळे सर , विज्ञान तज्ञ वाघवालेसर चव्हाण सर, कदम सर ,, ढवळेसर, शेख सर, घोळवे सर ,जायभाय सर, सानप सर ,नागरगोजे सर ,कंठाळे सर, आधापुरे सर, ढाकणे सर, तांदळे सर, राऊत सर, खेडकर सर,अग्रवाल मॅडम ,परजने मॅडम सोनवणे मॅडम खाडे मॅडम मगर मॅडम ,नांदगावकर मॅडम ,ढाकणे मॅडम निकाळजे मॅडम नागरगोजे मॅडम , कुलकर्णी मॅडम,मस्के सर, शिंदे सर गीते सर ढास सर घुगे सर हांगे सर मुंढे मामा ,केदार मामा , तसेच प्रगती व नवनिर्माण शिक्षण मंडळाचे सर्व मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व पालक या सर्वांनी गुणवंत यशवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील शिक्षणात शुभेच्छा दिल्या

# तेलवर्गीय पिके लागवडीला शेतकऱ्याचा नकार!

तालुका : जवस, कान्हेळे, अंबाडी, करडई, सूर्यफुलची अत्यल्प पेरणी पाचोड । किसान न्युज शेतकऱ्यांनी अलीकडे रब्बी हंगामात गहु, ज्वारी व हरभरा पिकाला अधिक पसंती दिल्याने मागील आठ–दहा वर्षांपासून रब्बी हंगामातून तेलवर्गीय असलेल्या जवस, काळे, अंबाडी, हुलगे, करडई व सूर्यफुलाचे पीक जवळपास इतिहासजमा होण्याच्या मार्गावर असून, यंदा सूर्यफुलाचे क्षेत्र शून्य टक्के तर करडईचे केवळ दहा मंडळात दोन हेक्टर व जवसाचे एका हेक्टरवर पेरा असल्याचे चित्र महसूल व कृषी विभागाकडील आकडेवारीवरून पाचोडसह पैठण तालुक्यात दिसून येते. शासनाने तेलबिया उत्पादन व प्रक्रिया उद्योगात असलेली संधी विचारात घेऊन खाद्यतेल धोरणाला अनुसरून गत तीन वर्षांपासून महात्मा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (महाज्योती) अभियानाच्या माध्यमातून करडईचे नामशेष होणारे क्षेत्र जगविण्यासाठी शेतकऱ्यांना मोफत बियाणे वाटपाचा कार्यक्रम राबवून शेतकऱ्याना प्रोत्साहित केले. परंतु बाजारात सर्वाधिक मागणी असलेल्या करडई व सूर्यफुलाचे क्षेत्र अक्षरशः शून्य टक्क्यावर येऊन हे तेलवर्गीय पीक हद्दपारच झाल्याचे चित्र आहे. पूर्वी रब्बी हंगामात ज्वारीबरोबर करडईचे पीक हमखास घेतले जात असे, तर शेतकरी खरिपासह रब्बीत सूर्यफुलाचे पीक घेत होते. मात्र आता करडई व सूर्यफूल पिके घेण्याकडे सर्वच शेतकऱ्यांनी पाठ फिरविली. एवढेच नव्हे तर जवसाचे केवळ तीन गावांत एक हेक्टरच क्षेत्र असून, काळे, अंबाडी, हुलगे, ताग ही पिके जवळपास इतिहासजमा होण्याच्या मार्गावर असून, आज सर्वत्र करडई व सूर्यफुलापासून उत्पादित खंडाळा (ता. पैठण): तेलाचे भाव मोठ्या प्रमाणात वाढले असले तरी शेतकऱ्यांनी पिकविलेल्या करडई व सूर्यफुलास अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांनी ही पिके घेण्याकडे पाठ फिरवली आहे. सोयाबीन, ज्वारी, गहू व हरभऱ्यास पसंती दिली जात आहे. पूर्वी आहारात करडईचे तेल वापरणे शिवारात बहरलेले जवसचे पीक. प्रतिष्ठेचे व आरोग्यवर्धक मानले जात असे. परंतु आजकाल करडई दुर्मीळ झाली. त्यातच करडई पीक घेतल्यास ती मनुष्यबळाअभावी काढणीला अवघड ठरते. तसेच यांत्रिक पद्धतीने त्याच्या काढणीवर मर्यादा येऊन मजुरांवर करडई पिकाच्या सोंगणीसाठी अवलंबून राहण्यापेक्षा शेतकऱ्यांनी करडई सर्वात फायदेशीर पीक समजले जात असे. मात्र अवेळी पाऊस, ऋद्ध विविध रोगांचा प्रादुर्भाव तसेच बाजारात इतर पिकांच्या मानाने दर कमी असणे हे या पिकांचे क्षेत्र घटण्याची प्रमुख कारणे आहेत. शेतकरी अधिक फायदा मिळणाऱ्या ज्वारी, गहु, सोयाबीन, हरभरा पिकांकडे वळाल्याने तुर्तास पैठण तालुक्यात करडईच्या वाट्यात काटे येऊन सूर्यफूल, कान्हाळे, अंबाडी, ताग, हुलगे ही पिके इतिहास जमा झाली. करडई पाठोपाठ अन्य पिकांचे क्षेत्र घटीचेही तेच कारण असून याचे क्षेत्र शून्यावर आले आहे. शेतकऱ्यांनी स्वतःहून करडई व सूर्यफूल या तेलबिया शेतीकडे वळावयास हवे.

# मराठा सेवा संघ नायगाव आयोजित २५ डिसेंबर रोजी मराठा वधू वर परिचय मेळावा

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नायगाव : मराठा सेवा संघ नायगावच्या वतीने ४ था भव्य मराठा वधुवर परिचय मेळावा दिनांक २५ डिसेंबर रोजी, गुरुकुल पब्लिक स्कूल शेळगाव रोड नायगाव येथे संपन्न होणार आहे. मागील ३ वर्षापासून मराठा सेवा संघाच्या वतीने अगदी मोफत हा वधूवर परिचय मेळावा घेतला जातो. मराठा समाजातील विवाह इच्छूक वधूवरांना योग्य व अनुरूप असा जोडीदार निवडता यावा याच भूमिकेतून हा परिचय मेळावा प्रतिवर्षी घेतला जातो. यावर्षीचा मेळावा २५ डिसेंबर ला सकाळी दहा वाजता आयोजित करण्यात




आला आहे. समाजाचा वेळ,पैसा, श्रम वाचावेत हीच प्रमुख भूमिका या मेळाव्याच्या आयोजनाच्या पाठीमागे आहे. मराठा समाजाची सध्याची परिस्थिती पाहता अशा वधूवर परिचय मेळाव्याची समाजाला नितांत गरज आहे. समाजाची ही सध्याची गरज लक्षात घेऊन मागील सतत तीन वर्षापासून मराठा सेवा संघ नायगाव हा उपक्रम मोफत राबवित आहे.समाजबांधवही यासाठी चांगला प्रतिसाद देत आहे. विवाह इच्छुक वधूवरांनी व त्यांच्या पालकांनी आपल्या पाल्याच्या परिचयपत्रासह पूर्व नोंदणी वधू–वर परिचय मेळाव्याच्या कमिटीकडे करावी,असे आवाहन अध्यक्ष अशोक पवळे (९४२३३०६१४९)सचिव संतोष कल्याण (९४२३१३७८४६)कार्याध्यक्ष देविदास जाधव(७५८८५८४००१)कोषाध्यक्ष नारायण शिंदे(९१५८४००८९२) उपाध्यक्ष आनंद पवार (९४२३६५९३९९) उपाध्यक्ष चव्हाण जी बी (९४०५७७२०२०) सहसचिव नागेश कल्याण (७५८८४२९०९०) सल्लागार जाधव व्ही सी(९१५८४००६९९) सल्लागार शिंदे जी एम(९८६०८६०४२४) सल्लागार शिंदे बी डी (९८६०३५३४५२)सल्लागार प्रा.हणमंत जाधव(७०२०८३०१७८) आदींनी केले आहे.

# आंदोलनकर्ते यांना जिल्हाधिकारी, तहसिल कार्यालयाच्या आवारात निवारा शेड , पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहांची व्यवस्था करा :- डॉ.गणेश ढवळे

बीडः– ( दि.१६ )बीड शहरातील शासकीय कार्यालये उदाहरणार्थ जिल्हाधिकारी कार्यालय आणि तहसिल कार्यालयाच्या नविन इमारतीच्या नियोजित आराखड्यात आंदोलनकर्ते यांना बसण्यासाठी जागा, निवारा शेड,पिण्याचे शुद्ध पाणी व स्वच्छतागृहाची सोय करण्यात यावी आणि बीड शहरातील बीड ते नगर रोड राष्ट्रीय महामार्गावरील रूंदीकरण दरम्यान नालीच्या कामासाठी शासकीय कार्यालयासमोरील संरक्षक भिंती आणि नगरपालिकेने बांधलेली स्वच्छतागृहे तोडण्यात आली त्यामुळे शासकीय कार्यालयात येणा–या नागरीकांची गैरसोय होत असुन नालीचे बांधकाम पूर्ण झालेल्या ठिकाणी तातडीने संरक्षक भिंत आणि स्वच्छतागृहे बांधण्यात यावीत.अथवा



लोकवर्गणीतून आंदोलनकर्त्यांना निवारा शेड बांधण्याची रितसर परवानगी देण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर , माहिती आधिकार कार्यकर्ते शेख युनुस, शेख मुबीन,शेख मुस्ताक यांनी शिवकुमार स्वामी निवासी उपजिल्हाधिकारी बीड यांना लेखी निवेदनाद्वारे करत प्रजासत्ताक दिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनाचा ईशारा दिला आहे. आंदोलनकर्ते यांना नियोजित जागा, निवारा शेड, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे याची सोय उपलब्ध करावी बीड शहरातील नगररोड वरील जिल्हाधिकारी, तहसिल, पंचायत समिती, सामाजिक न्याय भवन शासकीय कार्यालये याठिकाणी आंदोलनकर्ते यांना निवारा असणारी मोठमोठाली झाडे जिल्हा प्रशासनामार्फत तोडण्यात आली असुन आंदोलनकर्ते यांचा निवारा हिरावला गेला आहे.तसेच नवनिर्माण जिल्हाधिकारी व तहसील कार्यालय आवारात आंदोलनकर्ते यांच्यासाठी नियोजित जागा, निवारा शेड, पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करण्यात यावी. बीड नगर रोड रस्ता रुंदीकरण दरम्यान तोडण्यात आलेली नगरपरिषदेची स्वच्छतागृहे तातडीने बांधण्यात यावीत. बीड शहरातुन जाणा–या बीड ते नगर रोड राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरण दरम्यान नाली बांधकामासाठी बीड शहरातील न्यायालय, तहसिल, पंचायत समिती, सार्वजनिक बांधकाम, पोलिस मुख्यालय आदि शासकीय कार्यालया समोरील नगरपरिषदेने बांधलेली स्वच्छतागृहे तोडण्यात आली असुन शासकीय कार्यालयात कामकाजासाठी येणा–्या नागरीकांची गैरसोय होत असुन नाली बांधकाम झालेल्या ठिकाणी तातडीने स्वच्छतागृहे बांधण्यात यावीत.

# सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणी गेवराई तालुक्यात बंद यशस्वी

गेवराई , दि . १६ (प्रतिनिधी ) – परभणीतील भीमसैनिक तरुण सोमनाथ सूर्यवंशी यांच्या न्यायालयीन कोठडीतील मृत्यूप्रकरणी आज महाराष्ट्र बंदचे आवाहन करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यातही बंद पाळण्यात आला. गेवराई शहरासह तालुक्याच्या ग्रामीण भागातही या घटनेचा निषेध करण्यासाठी आणि व्यवसाय बंद करण्याचे आवाहन करण्यासाठी तरुण रस्त्यावर उतरल्याचे दिसले. तसेच या घटनेचा निषेध नोंदवण्यासाठी काही दिवसांपूर्वी शहरातील संविधान अधिकार मोर्चा समन्वयक समितीच्या वतीने गेवराई तहसील समोर निदर्शने करण्यात आली होती . तसेच सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबाला ५० लाखाची मदत करण्यात यावी, त्यांच्या कुटुंबाला संरक्षण देण्यात यावे, त्यांच्या मृत्यूला जबाबदार असणा–या पोलीस अधिका–यांना सह आरोपी करून त्यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात यावा,त्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरीमध्ये घेण्यात यावे, तसेच परभणी येथे झालेल्या दंगलीमध्ये दाखल करण्यात आलेले गुन्हे तात्काळ मागे घेण्यात यावेत, यासह विविध मागण्यांचे निवेदन यावेळी तहसील प्रशासनाला निवेदन देण्यात आले.यावेळी मोठ्या प्रमाणात घोषणाबाजी करण्यात आली.यावेळी तहसील प्रशासनाच्या वतीने नायब तहसीलदार संजय सोनवणे




यांनी निवेदन स्वीकारले. धम्म पाल कांडेकर, महेश सौंदरमल, विलास सुतार, प्रकाश भोले, संकेत गांगुर्डे,पप्पू गायकवाड, अमोल सुतार यांच्यासह असंख्य संविधान अधिकार मोर्चाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# गेवराईच्या युवा नेत्याच्या वाहनावर अज्ञाताचा गोळीबार

**- ड्रायव्हर अत्यवस्थ -** - –– शहागड हायवेवर पैठण फाट्यावरील गंभीर घटना गेवराई ,दि. १५ (मुदसीर शेख) तालुक्यातील एक युवा राजकीय नेता आणि सामाजिक कार्यकर्ता आपल्या वाहनातून गेवराई – छत्रपती संभाजीनगर महामार्गावरून जात असताना रात्री १०.३० च्या सुमारास अज्ञात इसमाने गाडीच्या दिशेने गोळीबार केल्याने गाडीच्या ड्रायव्हरला गोळी लागून गाडीचा ताबा सुटून गाडीने चार–पाच पलट्या मारल्या . त्यामुळे गाडीचा ड्रायव्हर हा गंभीर जखमी झाला आहे . त्यास छत्रपती संभाजीनगर येथील सिगा रुग्णालयात प्रथम उपचार करून पुढील उपचारासाठी पुणे येथे हलविण्यात आले आहे . दरम्यान गाडीमालक बी. एम. मस्के यांना गोंदी पोलिसांनी चौकशीसाठी बोलावले असल्याचे सूत्रांनी सांगितले . याबाबतची सूत्राने दिलेली सविस्तर माहिती अशी की, गेवराईतील पूर्वाश्रमीचे बी. आर. एस .पक्षाचे अध्यक्ष आणि गेवराई तालुक्यातील रेवकी गावच्या सरपंचाचे पुत्र सामाजिक कार्यकर्ते, युवा नेते बाळासाहेब उर्फ बी . एम . मस्के हे आपल्या एम . एच . १२ टी डी ००९९ या ग्लोस्टार वाहनातून दिनांक १४ डिसेंबर रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास गेवराई – छत्रपती संभाजीनगरकडे जात असताना



शहागडच्या पुढे असलेल्या पैठण फाट्यावर हायवेला अज्ञात इसमाने बी .एम . मस्के यांच्या वाहनाच्या दिशेने पिस्तुलातून गोळी झाडल्याने ती गोळी ड्रायव्हर कबीर प्रकाश सोनवणे (रा. जायकवाडी वसाहत, बाग पिंपळगाव ता . गेवराई )यांच्या पोटात घुसल्याने त्यांचा गाडीवरील ताबा सुटला आणि गाडी हायवेवर दोन–चार पलट्या खाऊन झाडाला धडकली . त्यामुळे गाडीचे बलून ओपन होऊन बी .एम .मस्के हे बालंबाल बचावले . त्यांना कुठलीही गंभीर इजा झाली नाही .मात्र ड्रायव्हर कबीर सोनवणे हा गंभीर जखमी झाला . गाडी पूर्णपणे डॅमेज झाली असून ड्रायव्हरला प्रथमतः घाटी रुग्णालयात आणि नंतर सिग्मा हॉस्पिटलमध्ये उपचारार्थ दाखल करण्यात आले होते . परंतु त्यांची प्रकृती अत्यवस्थ झाल्याने त्यांना पुणे येथील हॉस्पिटलमध्ये उपचारार्थ हलविण्यात आले . याबाबत गोंदी पोलीस स्टेशनला संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता संपर्क झाला नाही . त्यामुळे अधिक माहिती मिळू शकली नाही . अशी घटना घडलीच कशी असे तर्कवितर्क गेवराई शहरात काढले जात आहेत . गोळी नेमकी कुणी झाडली हे मात्र समजू शकले नाही .

# परभणीच्या जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षकांनी बौध्द वसतिमध्ये शांतता बैठक घेऊन भयभीत समाजाला विश्वास निर्माण करावा- नितीन सोनवणे

परभणी प्रकरणी खालील प्रमुख मागण्या ,
१ संविधानाची विठंबना करणाया समाजकंठक आरोपीचे मास्टरमांइड अटक झाली पाहिजे.
२) पोलिसांच्या कोबिंग ऑपरेशनची आणि एकूण सर्व प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करावी.
३) कलम १७६ (१अ) सीआरपीसी अन्वये या प्रकरणाची चौकशी करावी.
४) न्यायालयीन चौकशी ही सेवानिवृत्त न्यायाधिशाकडून न करता सिटींग न्यायाधिशामार्फत करावी.
५) पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड सह इतर पोलीस अधिका–यांवर कलम ३२ अन्वये, अॅट्रॉसिटी कायद्यान्वये कलम ३(१) आणि ३(२) प्रमाणे गुन्हे दाखल करावेत. सोबतच सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा.
६) परभणी शहरातील सर्व पोलीस स्टेशन मधील तातडीने सीसीटीव्ही जप्त करून ते सीसीटिव्ही तपासावे.
७) सोमनाथ व्यंकट सूर्यवंशी यांच्या कुटुंबियांना सरकारने तातडीने १ कोटीची आर्थिक मदत जाहीर करावी.
८) सोमनाथ व्यंकट सूर्यवंशी यांच्या कुटुंबातील एका व्यक्तिस तातडीने शासकीय नोकरी देवून त्यांचे पुर्नवसन करावे.
९) वच्छलाबाई मानवते या महिलेला मारहाण करणा–या पोलिसांवर तातडीने ३५४, ३०७ अंतर्गत गुन्हे दाखल करुन त्यांना निलंबीत करावे.
१०) च्छलाबाई मानवते यांना सरकारने १० लाख रुपयाची आर्थिक मदत करून त्यांचे पुर्नवसन करावे.
११) न्यायालयीन कोठडीत असलेल्या आणि रुग्णालयात उपचार घेत असलेल्या सर्वांचे पुन्हा एकदा न्यायाधिश यांच्या उपस्थितीत मेडीकल करावे.
१२) पोलिसांनी केलेल्या कोबींग कारवाईत बौध्द वस्तीतील लोकांच्या झालेल्या घरांची नुकसान भरपाई द्यावी. जिल्हा प्रशासनाने त्या सर्व घरांचे तातडीने पंचनामे करून घ्यावे.




१३) पोलिसांच्या कोबिंग कारवाईत निर्दोष जखमी झालेल्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी.
१४) संविधान शिल्पाची विटंबना करणा–या सोपान पवार याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा.
१५) १० डिसेंबर २०२४ रोजी पार पडलेला सकल हिंदू समाज मोर्चातील संयोजक यांची चौकशी करावी.) यासोबत त्या मोर्चातील सर्वांची भाषणे तपासून त्यांच्यावर कारवाई करावी.
१६) संतोष देशमुख यांच्या हत्याकांडाच्या धरतीवर जी सी.आय.डी. आणी एस.आय.टी लावली ती सोमनाथ सुर्यवंशी यांच्या तपासासाठी लावावी.
१७ महिला व विद्यार्थ्यावरील गुन्हे तात्काळ मागे घेण्यात यावेत.
१८) महाराष्ट्रामध्ये ज्या ज्या ठिकाणी महापुरुषांचे पुतळे आहेत त्या त्या ठिकाणी पोलीस प्रोटेक्शन देण्यात यावेत व सीसीटिव्ही बसविण्यात यावेत.
१९ दलित (बौध्द) वस्तीत घुसून रिक्षा, मोटारसायकल, फोडताना पोलीसांचा व्हिडियो व्हायरल होतोय त्याची चौकशी करुन संबंधीतावर कार्यवाही झाली पाहिजे.
२०) जिल्हाधिका–यांनी व पोलीस अधिक्षकांनी बौध्द वस्तीमध्ये शांतता बैठक घेवुन भयभीत समाजाला विश्वास निर्माण केला पाहिजे अशी ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने मागणी करण्यात येत आहे.

१) मा.ना.श्री.देवेंद्र फडणवीस साहेब, मुख्यमंत्री तथा गृहमंत्री महाराष्ट्र राज्य.
२) मा.ना.श्री.एकनाथजी शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य.
३) मा.ना.श्री.अजित (दादा) पवार साहेब, उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य.
४) मानवी हक्क आयोग (ह्युमन राईट्स कमिशन)
५) महिला आयोग महाराष्ट्र राज्य.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार १७ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



# पक्षश्रेष्ठींनी आपला कसा कसा अपमान केला ते भुजबळांनी A टू Z सांगितलं, पाहा काय-काय म्हणाले?

## मी रोखठोकच बोलतो. जोपर्यंत जीवाच जीव आहे, अन्याय होईल तोपर्यंत संघर्ष सुरु राहील.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळातून वगळण्यात आल्यानंतर ते अस्वस्थ झाले आहेत. भुजबळ बंड पुकारण्याच्या तयारीत आहेत. विशेष म्हणजे लोकसभा निवडणुकीपासून आपल्याला काय-काय पक्षादेश देण्यात आले आणि काय-काय घडलं? याबाबत सविस्तर अ टू न माहितीच भुजबळांनी जाहीर केली आहे. छगन भुजबळ यांनी आज ङ्गटीव्ही ९ मराठीफ्ला प्रतिक्रिया दिली. यावेळी ते बोलत होते. ङ्गमी लोकसभेला उभा राहत नव्हतो. मला सांगितलं की उभे राहा. मी नाशिकला एक महिना खूप तयारी केली. मी तयार झालो. त्यांनी असं सांगितलं की, आता मी नक्की जिंकणार. त्यावेळेला सुद्धा ऐन वेळेला ह्यांनी चुप्पी साधली. दोन दिवस प्रफुल्ल पटेल, अजित पवार आणि सुनील तटकरे मला सांगायचे की, अमित शाह-मोदींचा निरोप आहे, तुम्हाला उभं राहावं लागेल. उभं राहायचं ठरवलं तर नाव जाहीर करत नव्हते. एक महिना झाला तरी नाव जाहीर केलं नाही त्यामुळे मी माघार घेतली, असं छगन भुजबळ यांनी सांगितलं. ङ्गमग पुढे राज्यसभेच्या दोन जागा निघाल्या. एक सुनेत्रा ताई पवार यांना दिलं. ठिक आहे. दुसरं कुणाला दिलं? तर वाईचे आमदार मकरंद पाटील यांचे भाऊ नितीन पाटील यांना दिलं. का दिलं तर म्हणे, मी सभेत सांगितलं होतं की, तुला खासदार करेन आणि आता तू माघार घे म्हणून. ही काय पद्धत आहे? मी गेलो तर पक्षाला फायदा होईल. समजून घ्या, असं मी सागूंनही त्यांनी त्यावेळेला राज्यसभा दिली नाही. म्हणायचे की, तुम्ही विधानसभेला उभं राहिलं पाहिजे, त्याम ुळे पक्ष चांगला मजबुतीने उभा राहील. त्यामुळे निवडणुकीला उभा राहिलो, असा गौप्यस्फोट भुजबळांनी केला.

### भुजबळांचं सूचक वक्तव्य

काही मानसन्मान आहे की नाही? जिथे मानसन्मान नाही तिथे तुम्ही मला सोन्याचं पान दिलं तरी काही नाही. मी रोखठोकच बोलतो. जोपर्यंत जीवाच जीव आहे, अन्याय होईल तोपर्यंत संघर्ष सुरु राहील. लासलगाव-येवला माझा मतदारसंघ आहेत. म झे मतदार आहेत. त्यांच्याशी मी बोलेन. समता परिषदेच्या कार्यकर्त्यांशी बोलेन आणि नंतर ठरवेन काय करायचं. सर्वांना विचारून निर्णय घेईन. पण एक आहे जहाँ नहीं चैना वहा नहीं रहनाङ्क, असं सूचक वक्तव्य छगन भुजबळ यांनी केलं

### मी तुमच्या हातातलं खेळणं आहे?

ङ्गजरांगे यांच्यासोबत वाद झाला. माझं मताधिक्य घटलं. अगदी काँटे की टक्कर झाली. आता ते म्हणायला लागले, जेव्हा मंत्रिपदाची शपथ घ्यायची वेळ आली तेव्हा तुम्ही राजीनामा द्या आणि राज्यसभेत जा. आम्ही नितीन पाटील यांचा राजीनामा घेतो. नितीन पाटील यांचा राजीनामा का घ्यायचा आहे? कारण त्यांच्या भावाला मकरंद पाटील यांना मंत्री करायचं आहे. आणखी नाशिकच्या कुणाला मंत्री करायचं असेल, यासाठी तुम्ही मला लहान पोरासारखं खेळवता, मी तुमच्या हातातलं खेळणं आहे? सांगतो द्या तर देत नाही. ज्यावेळेला संधी येते तेव्हा राजीनामा द्या म्हणतात. कारण एडजस्टमेंट करायची आहेङ्क, अशी खंत भुजबळांनी बोलून दाखवली.

# शिऊर येथील शेतक-याने काढले मक्याचे विक्रमी एकरी ४२ क्विंटल उत्पन्न

मौजे शिऊर तालुका वैजापूर येथील शेतकरी श्री अरुण जगन्नाथ गाजरी यांनी नुजिवीडू सीड्स च्या कॅप्सूल ४७ ८६ मक्का वाणापासून खरीप चे एकरी विक्रमी ४२ क्विंटल उत्पादन काढले यावेळी श्री अरुण जगन्नाथ गाजरी यांनी सांगितले की त्यांना कधीच एवढे विक्रमी उत्पादन काढते आले नाही पण कॅप्सूल ४७८६ हे मक्का वाण लावल्यानंतर त्यांना एकरी ४२ क्विंटल चा उतारा पावसाळी निघाला ते पुढे म्हणाले की याच्या दाण्याचा रंग आकर्षक व नारंगी असल्यामुळे आणि दाना देखील चप्पट आणि लांब आकाराचा असल्यामुळे बाजार भाव देखील याला चांगला मिळाला, पावसाळी मक्याचे उत्पन्न चांगले मिळाल्यामुळे परिसरात कॅप्सूल ४७ ८६ या मक्या वाणाची चांगली चर्चा आहे व येणा-या खरीप हंगामात शेतक-यांची मागणी देखील या वाणाला वाढणार आहे असे देखील ते म्हणाले.




# नुजिवीडू सीड्स कंपनीच्या नवीन संकरीत मका कॅप्सूल - ४७८६ या बियाण्याची लागवड करून अधिक उत्पादन

लासूर :- गंगापूर तालुक्यातील लासूर येथील प्रगतशील शेतकरी श्री संजय वामनराव पवार यांनी आपल्या शेतामध्ये खरीप हंगामामध्ये दोन एकर क्षेत्रामध्ये नुजिवीडू सीड्स कंपनीच्या नवीन संकरीत मका कॅप्सूल - ४७८६ या बियाण्याची लागवड केली होती तरी त्यांनी योग्य बियाण्याची निवड आणि योग्य नियोजन या यामुळे आपल्या दोन एकर क्षेत्रावर साधारणता ६४ क्विंटल उत्पादन मिळवले म्हणजे त्यांना एकरी ३२ क्विंटल असे खरीप हंगामात विक्रीमी उत्पादन मिळाले व त्या मका वानाच्या आकर्षक रंग त्या मका वाणाच्या आकर्षक रंग तसेच कॅप्सूल आकाराचे दाणे त्यामुळे त्यांना प्रतिक्विंटल २२०० रुपये बाजार भाव मिळाला . जो की बाजारातील सर्वोच्च बाजार भाव होता. कापूस पिकावर केला जाणारा खर्च व त्यापासून मिळत असलेला कमी मोबदला यासाठी मका पीक हे एक उत्तम पर्याय म्हणून आपल्याला उपलब्ध झाले आहे. तसेच कमी खर्चामध्ये अधिक उत्पादन खरीप हंगामामध्ये आपण नुजिवीडू सीड्स कंपनीचे कॅप्सूल ४७८६ या वानाची लागवड करून अधिक उत्पन्न मिळउ शकतो असे मत संजय पवार यांनी व्यक्त केले .

# कन्नड तालुक्यात नुजिवीडूच्या कॅप्सूल ४७८६ या मक्या वानाला शेतक-यांकडून वाढती मागणी



कन्नड तालुका हा नेहमीच म क्याच्या विक्रमी लागवडीसाठी जगभर प्रसिद्ध आहे यामुळे वेगवेगळया कंपन्यांच्या माध्यमातून त्यांच्या वाणाचा प्रचार प्रसार तालुक्यात होत असतो अशातच तालुक्यात एका मक्या वाणाची चांगलीच चर्चा आहे नुजिवीडू कंपनीने खरीप २०२४ ला दिलेल्या कॅप्सूल ४७ ८६ या मका वाणाचे चांगले उत्पन्न शेतक-यांना पावसाळी मि ळाले त्यामुळे शेतक-यांचा ओढा यावर्षी नुजिवीडूच्या कॅप्सूल ४७८६ या मका वानाकडे राहण्याचा अंदाज आहे, आमच्या बातमीदारा सोबत कोळवाडी येथील प्रगतशील शेतकरी श्री.गणेश राठोड याच्याशी चर्चा करताना म्हणाले की मी स्वतः मागील दोन वर्षापासून कॅप्सूल वाणाची लागवड करतोय आणि मी विक्रमी उत्पन्न या वाणापासून घेतोय, माझी कंपनीला विनंती राहील की यावर्षी कॅप्सूल या वाणाचा पुरवठा वाढवावा जेणेकरून म झ्यासारख्याच सर्व शेतक-यांना याचा लाभ होईल.

# नुजिवीडू सीड्सच्या मका -कॅप्सूल वाणामुळे शेतकरी राजा आनंदी

वैजापूर प्रतिनिधी - ऊक्कडगाव येथील प्रगतशील शेतकरी संदिप जगन्नाथ निकम यांनी त्यांच्या शेतात नुजिवीडू सीड्स कंपनीचे कॅप्सूल हे मकाचे बियाणे याची लागवड केली होती. त्यांच्या सांगण्यावरून त्यांनी एक हेक्टर मका लागवड केली होती. आणि त्यामध्ये एक एकर मध्ये दोन बॅग नुजिवीडू सीड्स चे कॅप्सूल हे वाण लावले होते. ज्या वेळेस मक्याचे खळे केले त्यावेळेस त्यांना इतर वाणाच्या तुलनेत कॅप्सूल या वाणाचे पाच क्विंटल मका जास्त झाली. एका एकरचे उत्पन्न ४५ क्विंटल आले. तर सदरील शेतक-याने पुढच्या वर्षी संपूर्ण मका लागवड करत्यावेळी नुजिवीडू सीड्सचे कॅप्सूल हेच वाण लावण्याचा निर्धार केला.




# ओबीसींचा मंत्रिमंडळात समावेश ; गेवराईत जल्लोष



गेवराई - दि . १५ (प्रतिनिधी ) -महाराष्ट्र राज्य मंत्री मंडळाच्या शपथविधीमध्ये नामदार धनंजयजी मुंडे ,ना .पंकजाताई मुंडे, ना . अतुलजी सावे, ना .जयकुमार गोरे, ना . माधुरी मि साळ, ना .दत्तात्रय भरणे, ना . संजय राठोड, ना .हसन मुश्रीफ यांना राज्य मंत्रिमंडळात समावेश झाल्याने भगवान नगर गेवराई येथे ओबीसी बांधवांनी फटाके फोडून व मिठाई वाटप करून जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी वामन गिते , अनिकेत मुंडे, संग्राम नागरे, संग्राम सानप, ऋषिकेश महानोर, राहुल वनवे, शिरीष मुंडे, आशुतोष खेडकर, वैभव सातपुते, गणेश बांगर, गणेश चाटे, अक्षय नागरे आदी युवा कार्यकर्ते उपस्थित होते .

# लवाद नामतालिकेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

बीड, दि. १६ :- बहूराज्यीय सहकारी संस्था अधिनियम,२००२ चे कलम ८४ (४) अन्वये सन २०२५-२०२८ या कालावधीसाठी लवाद नामतालिका (अीलळीींरीं झरपलश्र) तयार करण्यासाठी खालील व्यक्तिकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सर्व न्यायालयात निवृत न्यायाधिश व सेवानिवृत्त विधी अधिकारी प्रक्टीसिंग □डव्होकेटेस,चार्टड अकौन्टंट, कॉस्ट अर्कोन्टंट, राष्ट्रीय बॅका, ग्रामीण बँका, भूविकास बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, व्यापारी बँका, नागरी सहकारी बँका, राज्य सहकारी बँका यांच्या सेवेतील व्यवस्थापक दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले सेवानिवृत्त अधिकारी (ज्यांना सेवानिवृत्त होऊन दोन वर्षापेक्षा कमी कालावधी झालेला आहे) सहकार विभागातील उपनिबंधक दर्जापेक्षा वरच्या दर्जाचे सेवानिवृत्त अधिकारी (ज्यांना सेवानिवृत्त होऊन दोन वर्षापेक्षा कमी कालावधी झालेला आहे) अशा व्यक्तींची नियुक्ती करताना अधिनियमामध्ये नमूद नसले तरीही खालील प्रमाणे अहर्ता पात्रता असाव्यात.

त्यांच्यावर कोणत्याही स्वरुपाचे गुन्हे दाखल नासावेत, शासकीस बॅक सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी यांची कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू नसावी व सेवेत कोणताही ठपका ठेवलेला नसावा. अशी व्यक्ती कोणत्याही काळया यादीत (इश्रर्लज्ञ डळीीं) मध्ये समाविष्ठ नसावी. सदर व्यक्ती संबधीत विभागाच्या विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था कार्यालयाच्या अधिपत्याखाली येणा-या जिल्हयातील रहिवासी असावा (लातूर, उस्मानाबाद, बीड, नांदेड जिल्हयातील) व्यक्ती एकावेळी एकाच विभागातून अर्ज दाखल करू शकतो.

अर्जाचे विहित नमूने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांच्या कार्यालयात दि. १७ डिसेंबर २०२४ ते १६ जोनवारी २०३५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत मिळू शकतील, अर्ज सादर कण्याची अंतीम मुदत दि. १६ जानेवारी २०२५ पर्यंत आहे. प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी पूर्ण करुन दि. १४ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रारुप लवाद नामतालिका प्रसिध्द होईल.ही प्रारुप नामतालिका यादी संबधित विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयात लावण्यात येईल. प्रारुप नामीकेवर हरकती असल्यास ींरळवहरपळज्ञ८ऽ सारळश्र.लो या ईमेल आयडीवर पुराव्यासह हरकती दि. २१ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सादर कराव्यात. हरकती निर्णय दि. ११ मार्च २०२५ रोजी करुन दि. १८ मार्च २०२५ रोजी अंतीम लवाद नामतालिका प्रसिध्द करण्यात येईल.याबाबतची जाहिर सूचना संबधित कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आलेली असल्याचे लातूर सहकारी संस्थेचे, विभागीय सहनिबंधक, सुनिल शिरपूरकर यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com